

**इनक्युबेशन सुविधांचा समावेश असेल,** जेथे विद्यार्थी, व्यावसायिक, आणि उद्योजक एकत्र येऊन, नेटवर्किंग करून, नाविन्यपूर्ण संकल्पनांना चालना देण्यात येईल.

19. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय **उद्योजकांच्या व्यवसाय वृद्धीसाठी ₹१५ लाख पर्यंत व्याजरहित कर्ज** देण्यात येईल.

20. ओबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस, एनटी, व्हीजेएनटीमधील पात्र **विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.**

21. १८ ते ३५ वयोगटातील तरुणांच्या वार्षिक आरोग्य तपासणीसाठी **स्वामी विवेकानंद युवा आरोग्य कार्ड (Youth Health Card)** सुरू करण्यात येईल तसेच **नशामुक्त-व्यसनमुक्त महाराष्ट्रासाठी कायमस्वरूपी योजना** लागू करण्यात येईल.

22. महाराष्ट्रात प्राचीन आणि ऐतिहासिक गड किल्ल्यांची मोठी संख्या आहे. हे गड किल्ले महाराष्ट्राचे वैभव असून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक जडणघडणी मध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राच्या या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारश्याचे जतन व संवर्धन यासाठी **गड-किल्ले विकास प्राधिकरण** स्थापित करणार.

23. **'ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य'** धोरण स्वीकारण्यात येईल, ज्यात:

   a. प्रत्येक ज्येष्ठ नागरिकासाठी स्वयंचलित सेवा मिळवण्यासाठी **आधार सक्षम सेवा वितरण (AESD) लागू करणे.**

   b. वय वर्षे ८० व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी मागणी केलेली कागदपत्रे—जसे की **आरोग्य नोंदी, ओळखपत्रे आणि पेन्शन संबंधित कागदपत्रे—थेट त्यांच्या घरी पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येईल.**

   c. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये **ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बाह्यरुग्ण कक्ष (OPD) सुरू करण्यात येतील.**

24. **बळजबरी व फसवून केलेल्या धर्मांतराविरुद्ध कठोर कायदा** करण्यात येईल. बळजबरी आणि फसवणूक करणाऱ्या धर्मांतरापासून संरक्षण मिळेल.

25. वनालगत, शेतीमध्ये, मानवी वस्त्यांमध्ये वाघ, बिबट्या, हत्ती, रोही, रानडुक्कर आणि माकड या वन्यप्राण्यांमुळे होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी तसेच **मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) तंत्रज्ञान, ड्रोन आणि रेडिओ कॉलर** यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येईल.

# भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र


भाजपा मुख्यालय, सीडीओ बॅरक 1,
एलआयसी कार्यालयासमोर, नरीमन पॉईंट,
मुंबई - 400021

**भाजप-महायुती आहे, तर गती आहे**

**महाराष्ट्राची प्रगती आहे**

**कमळाचे बटण दाबा**

**भाजपला विजयी करा**




**भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र**

# २५ ठळक मुद्दे

1. **लाडक्या बहिणींना** प्रत्येक महिन्याला **रु. १५०० वरुन रु. २१००** देण्यात येतील तसेच या योजनेचे औचित्य साधून **महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल.** महिला सुरक्षेसाठी **२५००० महिलांचा** पोलिस दलात समावेश करण्यात येईल.

2. **शेतकऱ्यांना कर्जमाफी** आणि शेतकरी सन्मान योजनेतून **वर्षाला रु. 12,000 वरून रु. 15,000,** तसेच एमएसपीशी समन्वय साधत **20 टक्क्यांपर्यंत भावांतर** योजना राबविण्यात येईल.

3. प्रत्येक गरिबाला **अन्न आणि निवारा** देण्यात येईल.

4. **वृद्ध पेंशन धारकांना** महिन्याला **रु. १५०० वरुन रु. २१००** देण्यात येतील जेणेकरून संपूर्ण महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांना अधिक आर्थिक सुरक्षा आणि सन्मान मिळेल.

5. महाराष्ट्रातील सर्व कुटुंबांना बाजारातील उतार-चढावांपासून सुरक्षित करण्यासाठी राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या **किमती स्थिर** ठेवण्यात येतील.

6. **येणाऱ्या काळात २५ लाख रोजगार** निर्मिती तसेच महिन्याला **१० लाख विद्यार्थ्यांना रु. १०,००० विद्यावेतन** देण्यात येईल.







7. राज्यातील ग्रामीण भागात **४५,००० गावांत पांधण रस्ते** बांधण्यात येतील.

8. **अंगणवाडी आणि आशा सेविकांची** आर्थिक सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी महिन्याला **रु१५,०००** वेतन आणि **विमा संरक्षण** देण्यात येईल.

9. **वीज बिलात ३०% कपात** करुन **सौर आणि अक्षय ऊर्जेवर** भर देण्यात येईल.

10. **सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत 'व्हिजन महाराष्ट्र @ २०२९'** सादर करण्यात येईल.

11. सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राला **$१ ट्रिलियन अर्थव्यवस्था** बनविण्याचं लक्ष्य ठेवले आहे.

12. महाराष्ट्राला तंत्रज्ञान, उत्पादन आणि नावीन्यपूर्ण (Innovation) संकल्पना क्षेत्रातील जागतिक केंद्र बनवण्यासाठी खालील पावलं उचलण्यात येतील:

    a. **'मेक इन महाराष्ट्र'** धोरण राबवून, महाराष्ट्राचे भारतातील प्रमुख उत्पादक राज्य म्हणून असलेले स्थान अधिक मजबूत करण्यात येईल.

    b. **महाराष्ट्राला जागतिक फिनटेक व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) राजधानी बनविण्यात येईल.** त्यासाठी जागतिक फिनटेक कंपन्यांना आकर्षित करणारं वातावरण निर्माण करण्यात येईल आणि आर्थिक तंत्रज्ञानातील नवीन संकल्पनांना प्रोत्साहन देण्यात येईल. सोबतच AI संशोधन, नवकल्पना आणि विकासाला चालना देण्यासाठी **देशातील पहिल्या विशेष AI विद्यापीठाची स्थापना करण्यात येईल.**

    c. नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि नाशिकला आधुनिक **एरोनॉटिकल आणि स्पेस उत्पादन केंद्र** बनवून प्रगत एरोस्पेस तंत्रज्ञान आणि उत्पादन हब म्हणून विकसित करण्यात येईल.

13. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सर्वांगीण उपक्रमांद्वारे पुढीलप्रमाणे प्रयत्न करू:

    a. शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील **संपूर्ण राज्य वस्तु व सेवा कर (SGST) अनुदानाच्या स्वरूपात शेतकऱ्यांना परत देऊ.**

    b. शेतक-यांना प्रति क्विंटल किमान रु. ६०००/- भाव मिळावा यासाठी सोयाबीन उत्पादन, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनासाठी **समर्पित संपूर्ण शृंखलेची** स्थापना करू.

14. **सन २०२७ पर्यंत महाराष्ट्रात ५० लक्ष लखपती दीदी तयार** करण्यात येतील. यासाठी, **प्रत्येक ५०० स्वयंसहायता गटांचे एक औद्योगिक क्लस्टर** तयार करण्यात येईल आणि **₹१,००० कोटींचा प्रारंभिक फिरता निधी** उपलब्ध करण्यात येईल.

15. **'अक्षय अन्न योजना'** अंतर्गत, **कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना दरमहा मोफत शिधा** पुरविण्यात येतील. ज्यामध्ये तांदूळ, ज्वारी, शेंगदाण्याचे तेल, मीठ, साखर, हळद, मोहरी, जिरे आणि लाल मिरची पावडर यांचा समावेश असेल.

16. **'महारथी (महाराष्ट्र एडवांस रोबोटिक्स अँड AI ट्रेनिंग हब इनिशिएटिव्ह) - अटल टिंकरिंग लॅब्स योजना'** सुरू करण्यात येईल, ज्यामधून सर्व शासकीय शाळांमध्ये रोबोटिक्स आणि AI शिकण्याच्या संधी उपलब्ध होतील.

17. महाराष्ट्रात **कौशल्य जनगणना (Skill Census)** करण्यात येईल ज्यायोगे उद्योगाच्या गरजेनुसार कौशल्यांच्या तुटवड्यांचे विश्लेषण करून त्यावर आधारित उपलब्ध कुशल मनुष्यबळ उपलब्धकरुनदेणेआणिआवश्यकतेप्रमाणे नवीन कुशल मनुष्यबळ उपलब्धीसाठी नियोजन करता येईल.

18. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात **'छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र'** स्थापन करण्यात येईल, ज्याच्या माध्यमातून **१० लाख नवीन उद्योजक** तयार केले जातील. या केंद्रांमध्ये **को वर्किंग स्पेस** आणि